महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.

ई-मेल:- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

जा.क्र./OW.No.101/पोउआ/प्रकटीकरण /2023 दिनांक/Date : 25 /01/2023

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month November – 2022 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month November – 2022 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे नोव्हेंबर –२०२२ करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** '' याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे नोव्हेंबर – २०२२ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

१) गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–०५, गुन्हे शाखा, मुंबई, गुरक्र व कलम ३५७/२२ कलम ३०२ भादवि (शाहु नगर पोलीस ठाणे)

२) गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–०६, गुन्हे शाखा, मुंबई, गुरक्र व कलम गु.र.क्र.३०४/२२, कलम ३७९,३४ भा.दं.वि. सह ४३(ब),सह कलम ६६,७०(१) सह कलम ६६(एफ)(ए)(३) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० (चेंबूर पोलीस ठाणे गु.र.क्र. ६४७/२०२२)

**ब) माहे नोव्हेंबर – २०२२ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

विक्रोळी पोलीस ठाणे, परिमंडळ – ०७, गु.र.क्र. ९८/२०२० कलम ३७६(२)(आय)(एफ), (एन), ५०६(२) भादवि सह ४,६,८,१२ पोक्सो अधिनियम

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :—**

दिनांक २४/०१/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ’’** माहे नोव्हेंबर —२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर —२०२२

| | | |
|---|---|---|
| **११** | **कक्ष—५, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई** | **गु.र.क्र.३५७/२२, कलम ३०२ भादवि. (शाहु नगर पो.ठा.)** |

**—: “ खुन ’’:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयात दिनांक २७/११/२०२२ रोजी सकाळी ७.०० वा च्या सुमारास थंगमनन मंदिरा समोर, आण्णानगर, जगनजिवन राम चाळ, आंबेडकर शाळेजवळ, धारावी क्रॉस रोड, मुंबई १७ या ठिकाणी यातील मयत इसमच्या मानेवर व गळयावर दारूच्या बाटलीच्या फुटक्या काचेच्या तुकडयाने बरेच वार करून तसेच त्याचे गळयावर काच भोसकून त्यास जखमी करून रक्तबंबाळ केल्याने मयत इसमाच्या बहिणीने पोलीस ठाणेस हजर राहून अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून त्यांच्या भावाचा खून केल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन सदर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | सौ. आरती संतोष जैन वय ३५ वर्षे, |
| बळीत इसम | :— | बाबू महादेव काटरपल्ली, वय ४० वर्षे, |
| गुन्हयात वापरलेले हत्यार | :— | दारूच्या बाटलीचा काचेचा तुकडा |
| आरोपी अटक व दिनांक | :— | राकेश पुष्करसिंग डोबाल, वय २० वर्षे, **अटक दिनांक २९/११/२०२२ रोजी** |

**तपास कौशल्य :—** नमुद गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. गुन्हयाचे घटनास्थळाची बारकाईने तपासणी केली असता, घटनास्थळी दारूच्या बाटलीचे काचेचे अनेक तुकडे मिळून आले त्यावरून आरोपीत इसमाने दारूच्या काचेची बाटली फोडुन काचेच्या तुकडयाने मयत इसम यांचेवर वार केले असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळ परिसरात घटनेच्या अनूषंगाने चौकशी केली असता, सदरची घटना मध्यरात्रीच्या सुमारास घडली असावी त्यामुळे घटनेचे कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळून आले नाही.

या घटनेने परिसरातील महिलांमध्ये व जनमानसात भितीचे, असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून कक्ष ५ कार्यालयाने तीन पथके तयार करून **१) घटनास्थळ परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज प्राप्त करून त्याची तपासणी करणे. २) मयत इसम याचे कोणाशी वैमनस्य होते किंवा कसे तसेच मयत इसमाच्या दैनंदिन हालचालींबाबत माहिती प्राप्त करणे. ३) तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीतांचा शोध घेणे अशी कामाची विभागणी केली.**

घटनास्थळाच्या बाजूच्या गल्लीतील एका खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याची पाहणी केली असता दिनांक २७/११/२०२२ रोजी रात्रौ ०१.४५ वा च्या सुमारास यातील मयत इसम व त्याच्या पाठोपाठ एक इसम पायी चालत चालत थंगमनन मंदिरा समोरील गल्लीत प्रवेश करताना दिसून आले. सदर कॅमेऱ्याची अधिक वेळ पाहणी केली असता, साधारण ०२.४५ वा च्या सुमारास मयत इसम याचे पाठोपाठ चालत असलेला संशयित इसम एकटा मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या गल्लीतून बाहेर निघून मंदिराच्या बाजूस असलेल्या गल्लीत पायी चालत जाताना दिसून आला.

यातील मयत इसमाच्या पाठोपाठ फिरत असणारा संशयित इसमाचे वर्णन हे अस्पष्ट दिसत असल्याने त्याची ओळख पटविणे अशक्य झाले होते. अशावेळी घटनास्थळ परिसरात येणाऱ्या जाणाऱ्या मार्गावरील एकुण २३ सरकारी व खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासले असता, मयत इसम व संशयित इसम रात्रौ १२.३० वा पासून धारावी परिसरात एकत्रितरित्या पायी चालत फिरत असताना दिसून आले. तसेच संशयित इसम रात्रौ ०२.४५ वा च्या नंतर पहाटे ०४.३० वा पर्यत एकटा धारावी परिसरात पायी फिरताना दिसून आला त्यानंतर संशयित इसम खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यामध्ये कोठेही दिसून येत नव्हता. घटनेच्या साधारण १२

तासानंतर दुपारी ०२.०० वा सुमारास नमूद संशयित इसम धारावी ९० फिट रोडवरून सायन च्या दिशेने पायी चालत जाताना दिसून आला. त्यानंतर तपासी पथकाने सायन व मांटुगा परिसातील एकूण १९ सरकारी व खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासले असता नमूद इसम मांटुगा स्टेशनच्या दिशेने पायी चालत जावून मांटुगा रेल्वे स्थानक येथे आल्याचे दिसून आले.

मांटुगा रेल्वे स्थानक परिसरातील सर्व प्लॅटफॉर्म वरील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची पाहणी केली असता, नमूद संशयित आरोपी हा कल्याण लोकल ट्रेन मध्ये बसल्याचे दिसून आला. नमूद लोकल ट्रेन मार्गावरील माटुंगा ते डोंबीवली अशा एकूण १५ रेल्वे स्थानक परिसरातील प्लॅटफॉर्म वर लावण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची तपासणी केली असता, नमूद संशयित इसम डोंबीवली येथे लोकल ट्रेन मधून उतरल्याचे दिसून आले. संशयित डोंबीवली रेल्वे स्थानकातून बाहेर डोंबीवली पश्चिम परिसरात पायी चालत जाताना दिसून आला.

तपासाच्या अनुषंगाने मयत इसम रहावयास असलेल्या परिसरात मयत इसमाचा फोटो दाखवून माहिती घेतली असता, तो एका इसमासह दिनांक २६/११/२०२२ रोजी रात्रौ १०.३० वा च्या सुमारास ताडी माडी केंद्रामध्ये दारू खरेदी करण्यासाठी आला होता. संशयित इसमाचे प्राप्त अस्पष्ट छायाचित्र धारावी, शाहूनगर व डोंबीवली पश्चिम परिसरातील चहाची टपरी, पान टपरी, इस्त्रीचे दूकान, परिसरातील कुरियर बॉय, झोमॅटो व स्वीगी बॉय तसेच तेथील स्थानिक गुप्त बातमीदार यांना नमूद संशयित आरोपीतांचे प्राप्त अस्पष्ट फोटो दाखवून पाहिजे आरोपीताचा शोध घेण्यात आला.

तांत्रीक तपासात डोंबीवली रेल्वे स्थानक परिसर व डोंबीवली पश्चिम परिसर अशा वेगवेगळया एकूण ४ ठिकाणांवरील मोबाईल टॉवर सेल आय डी प्राप्त करून तेथील डम डाटा संबंधित मोबाईल कंपनीकडून प्राप्त करण्यात आला. सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची तपासणी करत असतेवेळी संशयित इसम दिनांक २७/११/२०२२ रोजी रात्रौ ०१.३० वा पासुन ते दुपारी ३.०० वा च्या दरम्यान अनूक्रमे शाहूनगर, धारावी, सायन, मांटुगा व त्यानंतर रेल्वे मार्गाने डोंबीवली पश्चिम येथे जात असल्याचे दिसून आल्याने त्याप्रमाणे एखादया मोबाईल क्रमांकाची हालचाल दिसून येते का याचा शोध घेवून एक संशयित मोबाईल क्रमांक प्राप्त करण्यात आला. नमूद संशयित मोबाईल क्रमांकांचा सी.डी.आर. प्राप्त करून त्याची तपासणी केली असता, नमूद संशयित मोबाईल क्रमांक दिनांक २७/११/२०२२ रोजी दुपारी ०३.१५ वा पासून बंद असल्याचे आढळून आले. तत्पुवी त्याने दिनांक २७/११/२०२२ रोजी रात्रौ ०२.४५ वा नंतर गुन्हा केल्यानंतर एकूण ३ मोबाईल क्रमांकावर वांरवार संपर्क केल्याचे दिसून आले.

नमूद ३ मोबाईल क्रमांकांचे सी.डी.आर. प्राप्त केले असता, त्यातील एक व्यक्ती डोंबीवली पश्चिम, जिल्हा ठाणे येथे वास्तव्यास असल्याचे सी.डी.आर. वरून दिसून आले. नमूद मोबाईल सी.डी.आर.मधील त्याचे नेहमीचे कॉलर इसमांशी संपर्क साधून सदर इसमास डोंबीवली पश्चिम परिसरातून ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेल्या इसमाकडे संशयित मोबाईल धारक(सी.सी.टी.व्ही. फुटेज मधील संशयित आरोपीताबाबत विचारपूस केली असता, त्याने संशयित इसमाचे त्याचे नाव राकेश सिंग पुष्कर सिंग डोबाल, रा.ठि. राज्य उत्तराखंड असे असल्याचे सांगुन नमूद संशयित इसम आज रोजी कल्याण रेल्वे स्थानक येथून राज्य उत्तराखंड येथे त्याचे मुळ गावी जाणार असल्याची माहिती दिली. सदरची माहिती प्राप्त होताच डोंबीवली व कल्याण रेल्वे संशयित इसमाचा शोध घेतला असता, एका संशयित इसमास त्याच्या चालण्याची लकब व पेहराव च्या आधारे संशयावरून ताब्यात घेतले व त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने सुरवातील नकार दिला. परंतू पथकाने नमूद संशयित इसमाकडे सतत दोन तास कौशल्यपूर्ण विचारपूस केली असता, त्याने गुन्हयाची कबूली दिली.

नमूद संशयित इसमाकडे अधिक विचारपूस करता त्याने यातील मयत इसम व त्याच्यामध्ये दिनांक २७/११/२०२२ रोजी रात्रौ ०२.०० वा च्या सुमारास दारू पिण्याच्या कारणावरून आपआपसात भांडण झाले होते. त्याकारणावरून आरोपीताने दारूची बाटली फोडून बाटलीच्या फुटक्या काचेच्या तुकडयाने यातील मयत इसमाच्या गळयावर अनेक वार करून त्यास गंभीर दुखापत केली व त्यानंतर मयत इसमाच्या पोटात काच भोसकून त्याचा खुन केला असल्याची कबुली दिल्याने त्यास कार्यवाही करिता शाहुनगर पो.ठाणेचे ताब्यात देण्यात आले

**गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—०५, गुन्हे शाखा, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | घनश्याम सत्यदास नायर, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | अजित महादेव गोंधळी, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहा.पोलीस निरीक्षक | जयदीप जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा.पोलीस निरीक्षक | अमोल माधव माळी, | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | विजय बेंडाळे, | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहा.पोलीस उप निरीक्षक | सुधाकर नामदेव साळंखे, | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहा.पोलीस उप निरीक्षक | अंकुश बाबालाल न्यायनिर्गुणे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | सहा.पोलीस उप निरीक्षक | अशोक पांडुरंग भुजबळ | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र. ०१५८ | अविनाश शंकर चिलप | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र. ०३२०४ | तनाजी शंकर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ना.क्र. ०३७३८ | सुनिल सुर्यकांत जाधव, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | मपोनाक्र. ०६०९६८ | दर्शना समीर काकीर्डे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.शि.क्र. ०८०३६२ | गणेश रघुनाथ काळे, | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शि.क्र. ०८०६८६ | सरफरोज सलिम मुलाणी, | प्रशस्तीपत्रक |
| १५ | स.फौ.चालक | शशीकांत घोरपडे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ना.चा.क्र.९९०६०७ | हरेश लक्ष्मण कांबळे | प्रशस्तीपत्रक |

## २) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर —२०२२

| | | |
|---|---|---|
| ०२ | **कक्ष—६, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई** | **गु.प्र.शा.,गु.र.क्र. ३०४/२०२२, कलम ३७९,३४ भा. दं.वि. सह ४३(ब),सह कलम ६६, ७०(१) सह कलम ६६(एफ) (ए) (३) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० (चेंबूर पोलीस ठाणे गु.र.क्र. ६४७/२०२२)** |

**—: " स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता आंतरजाल द्वारे अनाधिकृत पैसे कमविणे ":—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयात यातील आरोपींनी आपसात संगनमत करून यातील फिर्यादींची तसेच महाराष्ट्र, गुजरात आणि दिल्ली या राज्यातील नागरीकांची आधारकार्डशी लिंक असणारी गोपनीय माहीती आधारकार्ड नंबर, मोबाईल नंबर,त्यांचे संपूर्ण नाव, गाव, सध्याचा पत्ता,कायमचा पत्ता सर्व जुने बंद झालेले व चालू असलेले मोबाईल क्र., ई मेल आय.डी., जन्म तारीख, कुटुंबातील सदस्य त्यांची माहिती, इत्यादी चोरी करून ती Tracenow.co.in o wwwwwww.fonivotech.com नावाच्या दोन वेबसाईट द्वारे विविध खाजगी इसम तसेच खाजगी आस्थापनांना स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता अप्रामाणिकपणे, बेकायदेशीररित्या विक्री करून फिर्यादीच्या लौकिकास नुकसान पोहचविले म्हणून गुन्हा नोद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. रणजीत चंद्रकांत चव्हाण,. वय ३० वर्षे, |
| हस्तगत मालमत्ता | :— | १) १६ लॅपटॉप अं.कि.रू.४,७०,०००/—<br>२) १२ मोबाईल अं.कि.रू.२,९५,०००/<br>३) ५ हार्ड डिस्क अं.कि.रू.२१,५००/—<br>४) ३ पेनड्राईव्ह अं.कि.रू. ५००/—<br>५) १४ सिम कार्ड/१८ क्रेडिट/डेबीट कार्ड<br>७) रोख रक्कम रू.४४,३८०/रू.<br>**एकूण ८,३१,३८०/— रू.** |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) निखिल सुर्यप्रकाश येलिगट्टी, वय २५ वर्षे,<br>२) राहुल सुर्यप्रकाश येलिगट्टी, वय २७ वर्षे,<br>३)मोहम्मद इजाज हुसेन, वय ४८ वर्षे,<br>४) संदिप शिवाजी पालांडे, वय ४० वर्षे,<br>५)विकास सिताराम पेडामकर, ५४ वर्षे,<br>६) इस्तिआक दोस्तमोहमद शेख, वय ४४ वर्षे,<br>अटक दिनांक २३/११/२०२२ ते दिनांक ०६/१२/२०२२ रोजी अटक |

**तपास कौशल्य :—** नमूद गुन्हयांमधील अटक आरोपी व त्यांचे साथीदार हि एक सक्रिय टोळी असून, त्यांच्या कार्यपध्दती प्रमाणे वेब साईट बनवून ग्राहकांना बेकायदेशीररीत्या पासवर्ड देवून दरमहा मासिक शुल्क आकारून महाराष्ट्र, गुजरात व दिल्ली येथील नागरीकांची खाजगी माहिती मो.क्र., आधारकार्ड क्र, नातेवाईकांची माहिती व मो.क्र. इ. उपलब्ध करून दिली जात होती. सदरची माहिती हि बॅक लोन रिकव्हीरी एजन्सीना मोठया रक्कमा स्विकारून विक्री करण्यात येत होती

प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र साळुंखे यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराने माहिती दिली की, एक इसमाने त्याचे साथीदारासह Tracenow.co.in o www.fonivotech.com अशा नावाच्या दोन वेबसाईट विकसित केल्या असून, त्या ॲप्लीकेशनच्या माध्यमातून तो महारा ट्र, दिल्ली व गुजरात राज्यातील नागरीकांची त्यांचे नावावरून किंवा आधारकार्ड लिंक मोबाईल क्रमाकावरून त्यांचे संपूर्ण नाव, गाव, पत्ता सर्व जुने बंद झालेले व चालू असलेले मोबाईल क्र., ई मेल आय.डी., जन्म तारीख, कुटुंबातील सदस्य यांची त्यांनी जी कोठेही ोअर केलेली नाही अशी माहिती मिळते.

नमूद वेबसाईट वरून कशाप्रकारे माहितीची देवाण घेवाण होते किंवा खरेदी विक्री होते. यादृ टीने तांत्रिक अभ्यास करून, तांत्रिक विश्ले ाण करून सातत्याने सलग दोन माहिने प्रयत्न करून आरोपी इसमाचे कार्यालय व निवासस्थान याबाबत माहिती प्राप्त करून घेतली. त्यानंतर आरोपी इसमाचे कार्यालय व निवासस्थान याठिकाणी त्यांच्या हालचालीवर तसेच गुप्तपणे निगराणी ठेवण्यात येत होती.

दरम्यान पोलीस पथकाने आरोपींनी विकसित केलेल्या वेबसाईटद्वारे मागणी केलेले ुल्क भरून डमी कस्टमर म्हणून शिरकाव केला आणि कशाप्रकारे आधारकार्डशी लिंक असणारी माहिती

प्राप्त होते याचे प्रत्याक्षिक जाणून घेतले अशाप्रकारे तांत्रिक दृ टीने अधिकाअधिक प्राथमिक पुरावा आणि इतरही गोपनीय माहिती संकलित करून प्राथमिक पुराव्याच्या आधारावर दिनांक २३/११/२०२२ रोजी चेंबूर पोलीस ठाणेस गुन्हा दाखल केला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याचदिवशी पोलीसांची दोन पथके तयार करून एकाच वेळी आरोपीचे कार्यालय व राहते निवासस्थानी छापा टाकून तेथून सर्व संगणक, लॅपटॉप, हार्ड डिस्क,मोबाईल, सिम कार्ड इ. पंचनामा करून हस्तगत करण्यात आले आहे. वर नमुद गोपनीय माहीती डाटा संकलित करण्यात आला.

संकलित डाटाचा सायबर तज्ञांच्या मदतीने विश्ले ाण करून सदर डाटयामध्ये कोणत्या प्रकारची माहिति आहे. सदर माहिति कोणाकडुन घेतली आहे,याचा ाोध घेवुन एका इसमास हैदराबाद येथुन दि.२९/११/२२ रोजी, दोन इसमांना पुणे येथुन दि.०६/१२/२२ रोजी व आणखी एका इसमास अंधेरी,मुंबई येथुन दि.०७/१२/२२ रोजी अटक करण्यात आली असुन दि.०६/१२/२२ रोजी पुणे येथुन अटक करण्यात आलेला एक इसम एअरटेल या मोबाइल सीम कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी (महारा ट्र व गोवा सर्कल)आहे. तसेच अंधेरी, मुंबई येथुन अटक करण्यात आलेला इसम हा एअरटेल कंपनीत सन २०१९ पर्यंत कामास होता

सदर गुन्हयाचा तपास सुरू असून, आतापर्यंत केलेल्या तपासात सदर गुन्हयात मोठी आंतरराज्यीय साखळी कार्यरत असल्याचे दिसुन आले आहे. सदर गुन्हयात पाहिजे आरोपींविरूध्द अधिक पुरावा प्राप्त करून, त्यांना अटक करण्यात येत आहे

**गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—०६, गुन्हे शाखा, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | रविंद्र आत्माराम साळुंखे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | प्रशांत पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | हनमंतराव महादेव ननावरे, | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा. पोलीस निरीक्षक | सचिन गोविंद गावडे, | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहा. पोलीस निरीक्षक | मीरा कल्पेश देशमुख, | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | रामदास तात्याबा कदम, | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | सुभाष चिंधु मुठे, | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | स.फौ.२७५३५ | नितिन बंडू सावंत, | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | स.फौ.२७५३९ | विनय सकपाळ | प्रशस्तीपत्रक |
| १० | स.फौ.२७८७१ | प्रकाश रामराव आव्हाड | प्रशस्तीपत्रक |
| ११ | स.फौ. ३९५९ | महोदव भगवान कुरडे, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | स.फौ.२९३६१ | सुहास चंद्रकांत देसाई | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.९७०५४२ | विजय बबन भिलारे | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र. ९७१०६१ | संतोष रघुनाथ चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.९८०६९७ | नितीन नामदेव तुपे, | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ना.०४०३६३ | विद्यानंद गोरखनाथ शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ना.०४११३२ | विनोद प्रकाश गायकवाड, | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ना.३१००८ | अंकुश वामनराव वानखेडे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ना.०५०७४२ | दिपक सुकलाल मोरे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.६१२९४ | राहूल विष्णु आराख | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि.६१७०३ | सुरेश ज्ञानू घेरडे, | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.०७०४०० | संजय भास्कर भालेराव, | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि.०७०७७४ | दिंगबर आनंदराव माळवेकर, | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.०८०२९६/ | संभाजी विठ्ठल कोळेकर | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.८०३३९ | अमोल वसंत इंगळे | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | पो.शि.०९०६६४ | रणजित चंद्रकांत चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.०९०३१९७, | कृष्णा कनीराम पवार | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.०११०६४१ | समीर महिबुब शेख, | प्रशस्तीपत्रक |
| २९ | म.पो.शि. ०८१४२६ | संगिता तुळशीराम अभंग, | प्रशस्तीपत्रक |
| ३० | म.पो.शि.०९२०५५/ | शोभा संतोष सरोदे | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.ना.चा. ९८०७६५ | वसंत कृष्णा डाळे, | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.ना.चा.३१५२४ | गोकुळ साहेबराव जायभाये | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पो.शि.चा.१७१३६५ | युवराज भास्कर पाटील | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक २४/०१/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या " **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे नोव्हेंबर—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर — २०२२

| | | |
|---|---|---|
| **०१** | **विक्रोळी पोलीस ठाणे, परिमंडळ—६ मुंबई** | **गु.र.क्र.९८/२०२० कलम ३७६(२)(आय)(एफ),(एन), ५०६(२) भादवि सह ४,६,८,१२ पोक्सो कायदा** |

**—: " अल्पवयीन मुलीवर लैगीक अत्याचार ":—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात आरोपीने आक्टोंबर २०१९ ते दिनांक १६/०३/२०२० रोजी पर्यंत वेळोवेळी रात्रीच्या वेळी सफीया हॉटेलच्या मागे, ग्रुप नंबर ०२, सम्राटनगर हरी मस्जीदच्या समोर, विक्रोळी पुर्व मुंबई येथील रहाते घरी फिर्यादी कु. सबा मोहम्मद अस्लम साहिब वय १४ वर्षे ७ महिने यांचे सावत्र वडील नामे पुत्तन उर्फ सफीक समिउल्ला खान वय ४० वर्षे हे फिर्यादी यांचे सावत्र वडील असतांना तसेच फिर्यादी हया अल्पवयीन आहे हे माहित असतांना देखील फिर्यादी यांच्या इच्छेविरूध्द जबरदस्तीने वारंवार त्यांचेसोबत शरीरसंबंध ठेवून फिर्यादी यांना १६ आठवडयांची गरोदर केली तसेच सदर बाबत फिर्यादी हे त्यांचे आईस किंवा इतर कोणास सांगितल्यास फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन फिर्यादी यांनी सावत्र वडील नामे पुत्तन उर्फ सफिक समीउल्ला खान याचे विरोधात कायदेशिर तक्रार दिल्याने म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | कु. सबा मोहम्मद अस्लम साहिब |
| बळीत | :— | — |
| निकाल दिनांक | :— | दि.२९/११/२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | पुत्तन उर्फ शफीक समिउल्ला खान वय ४० वर्षे<br>अटक दिनांक १८/०३/२०२० रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा. विशेष सत्र न्यायाधीश, २९ वे न्यायालय श्री अे.जे.खान सो, शहर सत्र न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २९/११/२०२२ रोजी गुन्हयातील आरोपीता विरूद गुन्हा शाबीत झाल्याने त्यास २० वर्षे सश्रम कारावास व रू ३४ हजार दंड व दंड न भरल्यास ०१ वर्षे साधा कारावास अशी शिक्षा |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयात बळीताचा जबाब नोंद करणारे अधिकारी, आरोपीतास अटक करून त्याचे विरूध्द दोषारोपपत्र दाखल करणारे अधिकारी, तसेच नमुद गुन्हयात साक्षीदार यांना वेळेवर मा. न्यायालयात हजर करणारे समन्स वॉरंट स्टाफ, न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम करून मा. न्यायालयात अटक आरोपी विरूध्द शिक्षा लागणेयोग्य साक्षीदार हजर करणे व पुरावे सादर केल्याने आरोपीतास मा. न्यायालयाने २० वर्षाची शिक्षा व रू.३४,०००/— दंड अशी शिक्षा सुनावलेली आहे

विक्रोळी पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरिक्षक | शुभदा प्र. चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | अनिल पी. सोनवणे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस उप निरीक्षक | रावसाहेब मोटे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | जयदेव धनवडे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | म.पो.ह.क्र.९८०४६२ | अनिता सत्यवान पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | मपोहक्र.९८०२२८ | अंजना जनार्दन पालांडे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोशिक्र. ११०२७४ | निलेश कैलास माळी | प्रशस्तीपत्रक |

**टिप:—** वरिष्ठ /प्रभारी पोलीस निरीक्षक, गु.प्र.शा.,गु.अ.वि., कक्ष—०५, गु.प्र.शा.,गु.अ.वि., कक्ष—०६,आणि विक्रोळी पोलीस ठाणे यांना कळविण्यात येते की, Best Detection of the Month November – 2022 व Best Conviction of the November – 2022 या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ. वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळखं कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |

| | | |
|---|---|---|
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वतः नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)**पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs …………………………………, Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2022 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2022